नि.दि.दा.क्र. ७१/२०२३
प्रभाकर –वि– स्टेट
**निशाणी क्र. १५**

**प्रतिवादी क्र. १ व २ यांचे विधीज्ञ श्री. महाजन यांच्याकडून साक्षीदाराचा उलटतपास आज रोजी शपथेवर सुरु –**

२. हे म्हणणे खरे आहे की, वाद मिळकत ही राष्ट्रीय महामार्गाकरीता शासनाला पाहिजे होती. हे म्हणणे खरे आहे की, त्या अनुषंगाने शासनाने वृत्तपत्रामध्ये अधिसुचना प्रकाशीत केली, मोजणी केली आणि त्यानंतर त्याचा निवाडा घोषीत करण्यात आला. हे म्हणणे खरे आहे की, त्या त्या वेळेला मी माझा आक्षेप मुदतीत दिलेला नाही. हे म्हणणे खरे आहे की, भुसंपादन अधिकारी यांनी निवाडा प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांच्या नावाने घोषीत केला. भुसंपादनाची रक्कम उचलण्याकरीता भुसंपादन अधिकारी यांनी प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना नोटीस पाठविली होती. त्यावेळेला पहिल्यांदा मी व माझ्या भावाने जमिनीच्या हिस्साबाबत वाद उपस्थित केला. भुसंपादनाची रक्कम देण्याअगोदर मला माझ्या भावाला तसेच प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांना भुसंपादन अधिकारी यांनी सुनावणीकरीता बोलाविले होते. सुनावणी झाल्यावर भुसंपादन अधिकारी यांनी माझा उजर/आक्षेप फेटाळून लावला. त्यावेळी त्या निर्णयावर माझा काही आक्षेप असल्यास तो देवू शकता असे मला तोंडी सांगण्यात आले होते. हे म्हणणे खरे आहे की, त्यावेळेला मी आक्षेप न घेता दिवाणी न्यायालयात प्रस्तूतचा दावा सादर केला. हे म्हणणे खरे आहे की, उपविभागीय अधिकारी यांनी

त्या त्या वेळी कायद्यास अनुलक्षून कार्यवाही केलेली आहे. हे म्हणणे खरे आहे की, जिल्हा न्यायाधीश, चंद्रपूर यांच्यासमोर मी या प्रकरणासंदर्भात कोणतीही कार्यवाही अथवा अर्ज सादर केलेला नाही. हे म्हणणे खरे नाही की, मी विनाकारण सरकारला या प्रकरणात पक्षकार म्हणून सामील केले आहे.

**प्रतिवादी क्र. ३ ते ५ यांचे विधीज्ञ श्री. भागवत यांच्याकडून उलटतपास** –

नि.क्र. ३७ वरील अर्जावरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकूब.

श्रवणोत्तर स्विकृती

माझे समक्ष

**( एस.एम.गोडसे )**
दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
दिनांक : २१/०७/२०२६

**( एस.एम.गोडसे )**
दिवाणी न्यायाधीश (व. स्तर),
चंद्रपूर